


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २१४ ●सोमवार, दि.०३ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# राज्यातील 28 साखर कारखान्यांना मिळाला गाळप परवाना;
## 33 कारखान्यांचे परवाने आयुक्तालयाच्या तपासणीत

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील साखर गाळप हंगामाला १ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली असून आतापर्यंत २८ कारखान्यांना परवाना देण्यात आला आहे तर ३३ कारखान्यांचे परवाने आयुक्तालयाच्या स्तरावर तपासणीत आहेत. येत्या दोन दिवसांत त्यावर कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिली.

परवाने देण्याची प्रक्रिया सुरूच असून प्रादेशिक स्तरावर काही अर्ज आले आहेत तर काही अर्जाच्या पूर्ततेसाठी कारखान्यांना कळविण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, कारखान्यांना ऊसगाळपावर आधारित विविध निधी भरण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे. मात्र, त्यासाठी हमीपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील साखर गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीने नुकताच घेतला होता. त्यानुसार हंगामाला सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी साखर आयुक्तालयाने २८ कारखान्यांना गाळपाची परवानगी दिली आहे तर ३३ कारखान्यांच्या परवान्याची तपासणी आयुक्तालयाच्या स्तरावर सुरू असल्याची माहिती साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिली तर ७२ परवान्यांबाबत प्रादेशिक स्तरावर कार्यवाही सुरू आहे. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनकडून (विस्मा) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नुकतीच निधी भरण्यास मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार कोलते यांनी मुदतवाढ दिली आहे. मुख्यमंत्री ▶▶ उर्वरित पान २ वर



**● परवाना प्रस्ताव सादर**

**थकित एफआरपी असणाऱ्या ७ साखर कारखान्यांना ऊसगाळप परवाना दिला जाणार नाही, असेही साखर आयुक्तांनी स्पष्ट केले. राज्यात सहकारी १०७ व खासगी १०७ मिळून २१४ साखर कारखान्यांनी प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयात ऊसगाळप परवाना प्रस्ताव सादर केले आहेत.**

# भाजप व मित्र पक्षाला कर्जमाफी होत नाही
## तोपर्यंत मतदान करु नका : बच्चू कडू

**अमरावती । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांची कर्जमाफी होत नाही तोपर्यंत भाजप आणि मित्र पक्षाला आगामी निवडणुकीत मतदान करू नका, असे आवाहन प्रहार संघटनेचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू यांनी केले आहे. दरम्यान शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करणारे बच्चू कडू मॅनेज झाल्याचा आरोप होतो आहे.त्यावरूनही साधला. तुम्ही आंदोलन करा त्यात आम्हीही येऊ असे ते म्हणाले. ३० जून २०२६ पर्यंत सरकारने कर्जमाफी केली नाही तर १ जुलै रोजी हंगामा होईल, असा इशाराही त्यांनी दिला. शेतकरी अजूनही आमच्या बाजूने उभा आहे. त्याला विश्वास आहे. आम्ही आंदोलनादरम्यान भर ▶▶ उर्वरित पान २ वर



बच्चू कडूंनी विरोधकांवर रविवारी (दि.२) पत्रकार परिषदेत निशाणा

# चक दे इंडिया! भारतीय पोरींनी मैदान मारलं
## ICC वर्ल्ड कपच्या ट्रॉफीवर पहिल्यांदाच नाव कोरलं, फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेचा पराभव

### भारतीय महिला संघानं दक्षिण आफ्रिकेला हरवून पहिल्यांदाच महिला वन डे विश्वचषकावर आपलं नाव कोरलं

**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर हरमनप्रीत कौरच्या टीम इंडियानं इतिहास घडवला. भारतीय महिला संघानं दक्षिण आफ्रिकेला हरवून पहिल्यांदाच महिला वन डे विश्वचषकावर (India Wins ICC Womens World Cup 2025) आपलं नाव कोरलं. या विजयासह कोट्यवधी भारतीय क्रिकेट चाहत्यांचं स्वप्न साकार केलं. या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेसमोर २९९ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वुलवार्टनं शतकी खेळी केली केली. पण एका बाजूनं अपेक्षित साथ न लाभल्यानं तिचे प्रयत्न अपुरे ठरले. आणि भारतानं एका ऐतिहासिक विजयाला गवसणी.

शेफाली आणि स्मृती म ानधानाची विक्रमी भागीदारी

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय महिला संघाने दमदार सुरुवात केली. सलामीवीर स्मृती मानधाना आणि शेफाली वर्मा यांनी पहिल्या विकेटसाठी १०२ धावांची भागीदारी रचली. दोघींनी जबाबदारीने खेळ करत संघाला मजबूत पाया दिला. ही जोडी आणखी मोठी भागीदारी करेल असं वाटत असतानाच दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी पुनरागमन करत मंधानाला ४५ (५८) धावांवर माघारी पाठवलं. ▶▶ उर्वरित पान २ वर




# अजित पवार जिंकले, अध्यक्षपद मिळालं




**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनच्या अध्यक्षपदाची निवडणूक चर्चेचा विषय ठरली होती. या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे अध्यक्षपदाच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# अतिवृष्टीतील नुकसान पाहण्यासाठी केंद्राचे पथक आज राज्यात येणार

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्यातील अतिवृष्टीग्रस्ताना केंद्र सरकारकडून मदत देण्यासाठी अधिकाऱ्यांचे पाहणी पथक सोमवारी व मंगळवारी दि. ३ व ४ नोव्हेंबर रोजी राज्यात येणार आहे. या पथकात सात अधिकारी असून चार नोव्हेंबर रोजी ते काही ठिकाणी नुकसानीची पाहणी करतील अशा सूचना आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिवांना पाठविण्यात आल्या आहेत.



कृषी विभागाचे संचालक व कापूस विकास मंडळाचे डॉ. ए. एल. वाघमारे, जलशक्ती मंत्रालयाचे कंद्रप व्ही. पटेल, सत्येंद्र प्रताप सिंग, विशाल पांडेय, अभिषेक कुमार करण सरीन, डॉ. एसव्हीएसपी शर्मा असे या पथकातील अधिकाऱ्यांची नावे आहेत. राज्य सरकारने केंद्र सरकारकडे मदत मागितल्यानंतर नुकसानीचे स्वरूप तपासणीसाठी हे अधिकारी येणार असल्याचे सांगण्यात आले. मराठवाड्यात या वर्षी झालेल्या पावसामुळे नदीचे प्रवाह बदलले. गावच्या गावे पाण्याखाली गेली. हजारो एकरावरील जमीन खरवडून गेली. त्यामुळे शेतकरी हैराण झाला. या ▶▶ उर्वरित पान २ वर

# ही तर क्रूर थट्टा! पालघरच्या शेतकऱ्याला PM पीक विमा योजनेतून मिळाली 2.30 रुपयांची नुकसान भरपाई

**वाडा । प्रतिनिधी**

नोव्हेंबर उजाडला तरी पाऊसमारा कायम असल्याने शेती पाण्याखाली गेली असून, शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. निसर्गाच्या आघाताने त्यांच्या डोळ्यांत पाणी आणले असताना मुंबईला लागून असलेल्या पालघरच्या वाडा तालुक्यातील शिलोत्तर गावाम धील एका शेतकऱ्याची सरकारने विमा योजनेच्या नावाखाली थट्टाच केल्याचे समोर आले आहे. प्रधानमंत्री फसल विमा योजना अंतर्गत या शेतकऱ्याला नुकसानीपोटी अवघी २ रुपये ३० पैशांची भरपाई मिळाली आहे.




मधुकर बाबूराव पाटील असे या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी पीक विमा काढला आहे. जुलै ते ऑगस्टदरम्यान भातलागवडीच्या वेळी झालेल्या नुकसानीचे पंचनामेही करण्यात आले होते. राज्य सरकारकडून त्यांना सुमारे एक हजार रुपयांची भरपाई देण्यात आली. मात्र, पिकांचे नुकसान त्याहून अधिक असल्याचे त्यांचे म्हणणे ▶▶ उर्वरित पान २ वर

# रावसाहेब दानवे यांच्या नातवावर गुन्हा दाखल, काय आहे प्रकरण?

**नाशिक । प्रतिनिधी**

माजी केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते रावसाहेब दानवे यांचा नातू शिवम पाटील आणि इतर आठ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. नाशिकमधील सातपूर येथील उद्योजक कैलास अहिरे यांची १० कोटी रुपयांची फसवणूक प्रकरणात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातपूर पोलीस पुढील तपास करत आहेत.कंपनीतील शेअर भागीदारी आणि आर्थिक व्यवहारातील फसवणुकीसंदर्भात हा गुन्हा दाखल झाला. कैलास अहिरे हे भाजपचेच नाशिक येथील पदाधिकारी आहेत.



पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, कैलास अहिरे हे भाजप उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत. सातपूर एम आयडीसीमध्ये त्यांची एन. व्ही. ऑटो स्पेअर्स प्रा. लि. कंपनी आहे. एका कार्यक्रमात रावासाहेब दानवे आणि त्यांची भेट झाली. कंपनीवर कर्ज असून पैशांची निकड असल्याचे अहिरे यांनी त्यांना सांगितले. त्यावेळी रावसाहेब दानवे हे नाशिकला आले आणि त्यांनी प्रकल्प पाहिले. त्यावेळी त्यांनी सेटलमेंट करुन देण्याचे आश्वासन दिले. त्याबदल्यात कंपनीत ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिरुरच्या पिंपरखेडमध्ये संतप्त ग्रामस्थांनी वन विभागाचं कार्यालय पेटवलं

**पुणे । प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील पिंपरखेडमधून मोठी बातमी समोर येत आहे. या गावातील एका १३ वर्षीय मुलावर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे संपूर्ण गावात संतापाची लाट पसरली आहे. बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना सध्या महाराष्ट्रात वाढल्या आहेत. शिरुपच्या पिंपरखेडमध्ये घडलेल्या या घटनेम ुळे गावकरी प्रचंड संतप्त झाले आहे. गावकऱ्यांनी या घटनेनंतर वन विरोधाच्या आक्रमक भूमिका घेतली आहे. पिंपरखेडच्या संतप्त



नागरिकांनी वन विभागाच्या कार्यालयाला आग लावली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. परिसरात सध्या प्रचंड तणावाचं वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा वावर आहे, अशी चर्चा सुरु होती. स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत ▶▶ उर्वरित पान २ वर

# गणेश काळे खून प्रकरणात मोठी अपडेट, तपास अधिकाऱ्यांची मोठी मागणी, कोर्टात नेमकं काय घडलं?

**पुणे । प्रतिनिधी**

गँगवॉरमुळे पुणे पुन्हा हादरले आहे. पुण्याच्या कोंढव्यात शनिवारी गणेश काळे नावाच्या व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. गणेश काळेवर आंदेकर टोळीतील चार जणांनी गोळ्या झाडून गणेशची हत्या केल्याचे सम ोर आले आहे. तसेच त्याच्यावर कोयत्यानेही वार केल्याचे उघड झाले आहे. कोर्टात या प्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी सरकारी वकिलांनी मोठी मागणी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



तपास अधिकाऱ्यांची मोठी मागणी अमन शेख, मयूर वाघमारे आणि अरबाज पटेल या तीन आरोपीना कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी तपास अधिकाऱ्यांनी म्हटले की, या हत्येमागे आंदेकर टोळीच कनेक्शन आहे. ९ राउंड फायर केले आहेत. हे करायला कोणी सहकार्य केले? कटात कोण सहभागी आहे? पिस्तूल-कोयते कुठून आणले? याचा तपास करायचा आहे. त्यामुळे आरोपींना जास्तीत जास्त पोलीस कोठडी देण्यात यावी.'

सुनावणी वेळी सरकारी वकिलांनी, ९ गोळ्या झाडल्या २ बंदुका सापडल्या, केवळ गोळ्याचं नाही तर कोयत्याने देखील मारले. तो जगलाच नाही पाहिजे अशा हेतूने मारण्यात आलं कोणी वाहन दिल? ▶▶ उर्वरित पान २ वर

# महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी आयपीएस तेजस्वी सातपुते तपास करणार





**सातारा । प्रतिनिधी**

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथक म्हणजेच SIT ची स्थापना करणार असल्याची घोषणा केली होती. २४ ऑक्टोबर रोजी समोर आलेल्या या प्रकरणात आतापर्यंत दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान या प्रकरणाचा तपास आयपीएस तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली एस आय टी करणार आहे.

फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत महिला डॉक्टरने २३ ऑक्टोबर रोजी आत्महत्या केली होती. तिने तळहातावर लिहिलेल्या सुसाईड नोटम ध्ये पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर यांचे नाव लिहिले होते. दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली. त्यनंतर या प्रकरणामध्ये अनेक महत्त्वाच्या आणि मोठ्या नावांचा समावेश असल्याने पीडित डॉक्टरच्या कुटुंबासह विरोधकांनी सातत्याने या आत्महत्येच्या घटनेची एसआयटी चौकशी मागणी करण्यात येत होती. सातारा पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास झाल्यास त्यांच्यावर राजकीय दबाव येण्याची शक्यता असल्याने नि:पक्ष तपासासाठी विशेष तपास पथक नेमणे आवश्यक आहे, असे विरोधक म्हणत होते.

एका प्रकरणात महिला डॉक्टरने आपल्या तक्रारीमध्ये वरिष्ठांचा आणि पोलिसांचा दबाव असल्याचे नमूद केले होते. शवविच्छेदन ▶▶ उर्वरित पान २ वर



# भारतीय महिला क्रिकेटचा सुवर्ण विश्वविजय : राष्ट्रगौरवाचा ऐतिहासिक क्षण

भारतीय क्रीडा इतिहासात 2025 हे वर्ष सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल, कारण भारतीय महिला क्रिकेट संघाने प्रथमच विश्वचषक (Women's Cricket World Cup 2025) आपल्या नावावर करत संपूर्ण राष्ट्राचा अभिमान उंचावला आहे. या विजयानं केवळ एका स्पर्धेचं पारितोषिक जिंकण्यात अर्थ नाही, तर भारतीय स्त्रीशक्तीने जागतिक पटलावर आपली ओळख, सामर्थ्य आणि क्रीडाजिद्द किती उंचावली आहे, याचे प्रतीक आहे. मुंबईमध्ये पार पडलेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने प्रतिस्पर्धी दक्षिण आफ्रिका महिला संघाला पराभूत करून जेतेपद पटकावले आणि जगभरात भारतीय महिलांच्या क्रीडाप्रतिभेचा गौरवशाली नाद घुमवला. या विजयाने देशात साजरा होणारा उत्सव केवळ क्रीडाजगतातील आनंद नसून, सामाजिक परिवर्तनाचे, लिंगभाव समतेचे आणि स्त्री सक्षमीकरणाचे सजीव दर्शन आहे.

भारतीय महिला क्रिकेटचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. काही दशकांपूर्वीपर्यंत महिलांसाठी क्रिकेट हा केवळ 'पुरुषांचा खेळ' मानला जायचा. समाजातील पारंपरिक विचारसरणी, खेळात गुंतवणूक करण्याची असमानता, प्रशिक्षण व साधनांची कमतरता आणि कौटुंबिक बंधने या साऱ्या अडथळ्यांमधून भारतीय महिला खेळाडूंनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाने आपला मार्ग स्वतः तयार केला. मिताली राज, झुलन गोस्वामी, हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, शफाली वर्मा, दीप्ती शर्मा यांसारख्या खेळाडूंनी भारतीय महिला क्रिकेटला ज्या उंचीवर नेले, ती आज जगाच्या क्रीडाक्षेत्रात गौरवाने स्मरणात ठेवली जाईल. त्यांचं योगदान केवळ खेळापुरतं नाही, तर सामाजिक मानसिकतेत बदल घडवण्याचं काम त्यांनी केलं आहे.

2025 च्या या विजयानं अनेक वर्षांचा संघर्ष, धैर्य आणि सामूहिक प्रयत्नांचा परिपाक साधला आहे. या संघाने केवळ क्रिकेट खेळलं नाही, तर त्या खेळात राष्ट्रभावनेची जाणीव आणि स्त्री सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिला. भारतीय महिला क्रिकेट संघाने या विश्वचषकात दाखवलेला एकजूटपणा, तांत्रिक परिपक्वता आणि मानसिक ताकद हा भारतीय क्रीडा व्यवस्थेच्या नव्या युगाचा संदेश आहे. अंतिम सामन्यातील हरमनप्रीत कौरची कप्तानी, शफाली वर्मा, स्मृती मंधानाची, संयमी खेळी आणि दीप्ती शर्माचा ऑलराउंड परफॉर्मन्स यांनी भारतीय संघाला अविजेय बनवले. या विजयामागे प्रशिक्षक मंडळ, सहाय्यक कर्मचारी, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रत्येक खेळाडूची देशासाठी खेळण्याची प्रेरणा आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भारतीय महिला क्रिकेट संघाचा हा विजय स्त्री सक्षमीकरणाच्या प्रगत टप्प्याचे प्रतीक आहे. भारतात दशकानुदशके लिंगभाव असमानता ही सामाजिक समस्या राहिली आहे. शिक्षण, रोजगार, राजकारण आणि खेळ या सर्व क्षेत्रांत महिलांना समान संधी मिळवण्यासाठी दीर्घ संघर्ष करावा लागला. पण या विजयानं स्त्रिया केवळ 'दुसऱ्या क्रमांकावर' राहणारी व्यक्ती नाहीत, तर त्या नेतृत्व करू शकतात, संघाला विजयाकडे नेऊ शकतात, राष्ट्राचा अभिमान बनू शकतात, हे जगाला दाखवून दिलं आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाचा विजय म्हणजे लिंगभाव समतेचा विजय आहे.

क्रिकेट हा भारतात धर्मासारखा मानला जाणारा खेळ आहे. दीर्घकाळ तो पुरुषप्रधानतेच्या पिंजऱ्यात अडकलेला होता. पण 2025 च्या या विश्वचषकानंतर त्या चौकटी तुटल्या आहेत. भारतीय महिलांनी दाखवून दिलं की क्रिकेटवरील अधिकार कोणाचाही एकाधिकार नाही; प्रतिभा, मेहनत आणि जिद्द असली की मैदानावर कोणीही चमत्कार घडवू शकतो. या विजयानं ग्रामीण भागातील, लहान शहरांतील आणि आर्थिकदृष्ट्या मर्यादित कुटुंबातील मुलींना नव्या स्वप्नांची प्रेरणा दिली आहे. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार, अशा क्रीडाविजयांमुळे सामाजिक समता आणि आत्मसन्मानाची भावना व्यापक स्तरावर वाढते. ही केवळ खेळाची जिंक नाही, तर सामाजिक मानसिकतेची झेप आहे.

भारतीय महिला क्रिकेटचा विकास हा केवळ खेळाडूंच्या प्रयत्नांमुळे नाही, तर मागील काही वर्षांत झालेल्या संरचनात्मक बदलांमुळे शक्य झाला. भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळाने (BCCI) महिला क्रिकेटसाठी स्वतंत्र गुंतवणूक, करार आणि सुविधा निर्माण केल्या. महिला IPL (WPL) च्या स्थापनेनं महिला खेळाडूंना व्यावसायिक मंच उपलब्ध झाला. माध्यमांनीही महिला क्रिकेटकडे गांभीर्याने पाहायला सुरुवात केली. या सगळ्यामुळे महिला खेळाडूंना आत्मविश्वास मिळाला आणि समाजात त्यांच्या कार्याची दखल घेण्याची प्रवृत्ती वाढली.

या विजयानं देशात सर्व स्तरांवर स्त्री सक्षमीकरणाबद्दल सकारात्मक संदेश दिला आहे. ग्रामीण मुलींना वाटू लागलं आहे की क्रीडांगणही त्यांच्या स्वप्नांची पूर्ती करू शकतं. महिला खेळाडू आता केवळ 'प्रेरणास्थान' नाहीत, तर त्या समाजातील बदल घडवणाऱ्या 'प्रेरक शक्ती' बनल्या आहेत. या विजयामुळे मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलतो आहे, कारण समाजात आदर्श निर्माण झाला आहे की मुलगीने जर ठरवले, तर तीही आकाशाला गवसणी घालू शकते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अशा विजयांमुळे समाजात लिंगभेदावर आधारित रूढी मोडतात. स्त्रियांच्या क्षमतांबद्दलच्या पूर्वग्रहांचा भंग होतो आणि पुरुषसत्ताक मानसिकतेला जबाबदार प्रश्न विचारले जातात. महिला क्रिकेट संघाचा हा विजय म्हणजे भारतीय समाजाच्या बदलत्या मानसिकतेचं दर्शन आहे. जिथे स्त्रीला आता 'कमकुवत' म्हणून नव्हे, तर 'समान योगदानकर्ती' म्हणून ओळख दिली जाते.

अखेर सांगावसं वाटतं की भारतीय महिला क्रिकेट संघाचा 2025 विश्वचषक विजय हा केवळ एका खेळाचा गौरव नाही, तर भारतीय समाजाच्या प्रगत वाटचालीचा मैलाचा दगड आहे. या विजयानं सिद्ध केलं आहे की समतेच्या मैदानावर स्त्रिया केवळ स्पर्धक नाहीत, तर नेतृत्वकर्त्या आहेत. या विजयाने भारतातील प्रत्येक घरात, प्रत्येक मुलीच्या डोळ्यांत स्वप्न पेटलं आहे ते स्वाभिमानाचं, आत्मनिर्भरतेचं आणि राष्ट्रगौरवाचं. भारतीय महिला क्रिकेट संघाचे अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा..!

- डॉ. राजेंद्र बगाटे,

◆ पान १ वरून पुढे...

## राज्यातील 28...

सहाय्यता निधीसाठी साखर कारखान्यांनी ऊसगाळप परवाना अर्ज सादर करताना प्रतिटनास १० रुपयांपैकी अर्जाबरोबर आता ५ रुपये, तर उर्वरित ५ रुपये ३१ मार्चपूर्वी भरावेत. पूरग्रस्त निधी पाच रुपये प्रतिटन असून संपूर्ण ५ रुपये रक्कम गाळप परवाना अर्जासोबत भरण्यात यावी.

## भाजप व मित्र...

पावसात ट्रॅक्टर खाली होतो. तेथेच झोपलो, त्याचं कौतुक झालं नाही. सात दिवस अन्नत्याग आंदोलन केलं त्याचंही कौतुक कोणी केलं नाही. दीडशे सभा संपूर्ण महाराष्ट्रात घेतल्या त्याचेही कौतुक झालं नाही. फक्त आमचं काय चुकलं हेच बघितलं जातं. शेतकऱ्यांच्या आत्महत्या आम्ही थांबवायला चाललो आहे. मात्र उद्या आमच्यावरच आत्महत्येची वेळ येईल,अशी अवस्था आहे, असेही बच्चू कडू म्हणाले.३० जून पर्यंत कर्जमाफी झाली नाही तर १ जुलै रोजी चहू बाजूने हंगामा होईल. आणि जोपर्यंत कर्जमाफी होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांनी भाजप, अजित पवारांची राष्ट्रवादी, एकनाथ शिंदे यांची शिवसेना या पक्षांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत मतदान करू नका असे आवाहन त्यांनी केले.

## अजित पवार...

शर्यतीत होते. गेल्या अनेक दिवसांपासून ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न केले जात होते. त्याचाच एक भाग म्हणून अजितदादांचा गट आपल्या भाजपा या मित्रपक्षाशी चर्चा करत होता. दरम्यान, आता या चर्चेतून तोडगा निघाला असून अजित पवार यांची महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनच्य अध्यक्षपदी सलग चौथ्यांदा निवड झालेली आहे. एकूण ३१ सदस्य संघटनांपैकी २२ संघटनांनी अजित पवारांना पाठिंबा दिला आहे. ३१ पैसी २२ पेक्षा जास्त संघटनांचा अजित पवार यांना पाठिंबा- उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांची महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनचे(चज) अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली आहे. ३१ सदस्य संघटनांपैकी २२ पेक्षा जास्त संघटनांनी त्यांना पाठिंबा दिला. त्यांच्या पॅनेलमधील आदिल सुमारिवाला, प्रदीप गंधे आणि प्रशांत देशपांडे यांची उपाध्यक्षपदासाठीची निवडणूक न होता त्या पदावर विराजमान झाले.

## चक दे इंडिया!....

चांगली सुरुवात पण मधल्या फळीत अपयश... मानधना आणि शेफाली यांच्या जोडीने भारताला चांगली सुरुवात करून दिली होती, मात्र त्यानंतर कोणतीही फलंदाज जोडी मोठी भागीदारी करू शकली नाही. त्याचा परिणाम थेट धावफलकावर दिसून आला. स्मृती मानधनाच्या बाद झाल्यानंतर जेमिमा रॉड्रिग्ज २४ (३७) धावांवर बाद झाली, तर शेफाली वर्मा ८७ (७८) धावांवर माघारी परतली. कर्णधार हरमनप्रीत कौरकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, पण त्या फक्त २० (२९) धावा करून बाद झाल्या. अमनजोत कौरने १२ (१४) धावा केल्या. रिचा घोषने काही क्षण झळक दाखवत ३४ (२४) धावांची खेळी केली. शेवटी दीप्ती शर्मा ५८ (५८) धावा करून अखेरच्या चेंडूवर दुसऱ्या धावेसाठी धावताना धावबाद झाली. अशा प्रकारे भारताने निर्धारित ५० षटकांत ७ गडी गमावून २९८ धावा केल्या. भारताने दिलेल्या २९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी लॉरा वोल्वार्ट (कर्णधार) आणि ताजमिन ब्रिट्स ही जोडी मैदानात उतरली. दोघींनी सुरुवातीला संयमाने फलंदाजी करत धावसंख्या वाढवली. नवव्या षटकात दक्षिण आफ्रिकेचा स्कोर ५० च्या पुढे गेला. मात्र १०व्या षटकात संघाला पहिला धक्का बसला. अमनजोत कौरने ताजमिन ब्रिट्सला रनआउट केले. ब्रिट्सने २३ धावा केल्या. १२व्या षटकात श्री चरणीने दुसरे यश मिळवले, त्यांनी बॉशला शून्यावर माघारी पाठवले. १८व्या षटकात दक्षिण आफ्रिकेचा स्कोर १०० च्या पुढे गेला. पण २१व्या षटकात शेफाली वर्माने मोठी भागीदारी मोडीत काढत लुसला बाद केले. लुसने २५ धावा केल्या. २३व्या षटकात पुन्हा शेफालीने कमाल दाखवत मरिजाने कॅप्पला केवळ ४ धावांवर बाद केले. ३०व्या षटकात दीप्ती शर्माने जाफ्टाला १६ धावांवर बाद करत दक्षिण आफ्रिकेला पाचवा धक्का दिला. त्यानंतर ४०व्या षटकात दीप्तीने आणखी एक महत्त्वाचा विकेट घेतला, एनेरी डर्कसन ३५ धावांवर बाद झाली. ४२व्या षटकात दीप्तीने भारताला सर्वात मोठे यश मिळवून दिले. तिने दक्षिण आफ्रिकेच्या कर्णधार लॉरा वोल्वार्टचा शतकानंतरचा मौल्यवान विकेट घेतला. याच षटकात तिने ट्रायोनलाही बाद केले आणि विजय भारताच्या झोळीत घातला. दीप्ती शर्माने या सामन्यात तब्बल ५ विकेट घेतल्या आणि एक रनआउटही केला. तिच्या या अफलातून कामगिरीमुळे दक्षिण आफ्रिकेची संपूर्ण टीम २४६ धावांवरच गारद झाली.

## अतिवृष्टीतील नुकसान...

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकारने ३१ हजार कोटी रुपयांचे 'पॅकेज' जाहीर केले असले तरी त्याची काही रक्कम केंद्र सरकारकडून मिळणार आहे. अशी मदत मिळावी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. आता मदतीपूर्वी स्थितीची पाहणी करण्यासाठी किती घरांचे नुकसान झाले, किती विहिरी गाळाने भरल्या. किती शाळांना व आरोग्य केंद्राच्या इमारतीचे नुकसान झाले, वीज वितरणाचे पायाभूत नुकसान झाले याचे आकडे राज्य सरकारकडे जिल्हा प्रशासनाने कळविले असले तरी त्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी अधिकाऱ्याचे हे पथक येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. हा दौरा होणार असला तरी त्याचे अधिकचे तपशील मिळणे अद्याप बाकी आहेत, असे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

## ही तर क्रूर थट्टा!...

आहे. त्यातच 'प्रधानमंत्री फसल विमा योजनें'तर्गत तर चक्क २ रुपये ३० पैशांची भरपाई त्यांच्या बँकखात्यात जमा झाली. मे महिन्यापासूनच पावसाची संततधार सुरू आहे. मान्सून वेळेत आल्याने शेतकरी आनंदात होता. मात्र, हा आनंद फार काळ टिकला नाही. पावसाने उग्र रूप धारण केले आणि लागवड केलेली पिके आडवी झाली. पंचनामे झाले, मात्र भरपाईच्या नावाने कुणाला पाचशे, कुणाला हजार, काहींना १,२००-१,५०० रुपये मिळाले. यामुळे शेतकरी हतबल झाला असल्याचे चित्र आहे.

## रावसाहेब दानवे...

१४ टक्के शेअर देण्याची अट ठेवली. त्यानुसार, २५ कोटींचे शेअर्स पवार यांना देण्याचा व्यवहार ठरला. हा व्यवहार झाल्यावर दानवे पुन्हा एकदा नाशिक आले. अहिरे यांना सुरुवातीला १४ कोटी ३४ लाख ९८ हजार रुपये देण्यात आले. पण उर्वरीत १० देण्यात आले नाही. त्याविषयी वारंवार संपर्क करूनही टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप अहिरे यांनी केला. तर दुसरीकडे कंपनीचे शेअर्स परस्पर दुसऱ्या व्यक्तीला वर्ग करण्यात आल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले. शेअर व्यवहारातून घोटाळा करण्यात आला. त्यानाराजीने अहिरे यांनी तक्रार दिली. माजी खासदार व माजी मंत्री रावसाहेब दानवे यांच्या नातूसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. कंपनीत १४ टक्के शेअर्स घेण्यासाठी २५ कोटींचा व्यवहार ठरवला, परंतु १० कोटी न देता शेअर्स स्वतःच्या नावे केल्याप्रकरणी शिवम मुकेश पाटील (दानवे यांचा नातू), गिरीश पवार, सतीश अग्रवाल, संजय कतीरा, सुभाष कतीरा, कौस्तुभ लटके, धीरेंद्र प्रसाद, मंदार टाकळकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. फसवणूक रक्कम डमी खात्यांतून हस्तांतरित करणे आणि फिर्यादीची दिशाभूल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणामुळे उद्योगवर्तुळात खळबळ उडाली आहे.

## शिरुरच्या पिंपरखेडमध्ये....

वेळोवेळी पोटतिडकीने आपले प्रश्न मांडले होते. सुरक्षेचा प्रश्न वारंवार उपस्थित करण्यात आला होता. अखेर आज एका बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर ग्रामस्थन संतापले. ग्रामस्थांनी आधी वन विभागाची गाळी पेटवून दिली होती. यानंतर रास्ता रोको करण्याचा इशारा देण्यात आला होता. तसेच रास्ता रोको देखील करण्यात आला. त्यानंतर आता वन विभागाचं कार्यालयच पेटवून देण्यात आलं आहे. या परिसरात बिबट्या आणि माणसं यांच्यातील संघर्ष टोकाला पोहोचला आहे. बिबट्याने आज १३ वर्षीय मुलावर हल्ला केल्यानंतर गावकरी संतप्त झाले. मुलाचा मृतदेह घराबाहेर ठेवत त्याच्या नातेवाईकांसह गावकऱ्यांनी आंदोलन केलं. संतप्त गावकऱ्यांनी बेल्हे-जेजुरी महामार्ग रोखला. तसेच वन विभागाची गाडी आणि नंतर कार्यालय पेटवत जाळपोळीच्या घटना घडल्या. या घटनेनंतर परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात झाला आहे. कोणत्याही प्रकारची अप्रिय घटना घडू नये यासाठी पोलिसांकडून सर्वोतोपरी काळजी घेतली जात आहे.

## गणेश काळे खून...

कोणी पैसे दिले? याचा तपास करायचा आहे, अशी माहिती दिली आहे. यावेळी बोलताना आरोपींच्या वकिलांनी म्हटले की, हत्येत वापरण्यात आलेले २ पिस्टल मिळाले आहेत. आरोपी १-२-३ आधीच जेल मध्ये आहेत. या आरोपींना जुन्या गुन्ह्यात घ्याच आणि त्यांना या गुन्ह्यात आरोपी करायचं असं चित्र पोलिसांनी तयार केल आहे. ज्याला मारण्यात त्याचा भाऊ वनराज आंदेकर हत्येत सहभागी होता म्हणून त्या गुन्हाचा आणि या गुन्हाचा काय संबंध आहे? पोलीस कोठडीची गरज काय ? वाहन शोधण्यासाठी २ दिवसाची पोलीस कोठडी दिली तर हरकत नाही.

## महिला डॉक्टर आत्महत्या ...

अहवाल बदलण्यासाठी खासदाराचे सहाय्यक दबाव टाकत असल्याचा उल्लेख तिने केला होता. पण, पोलीस आणि आरोग्य अधिकाऱ्यांनी तिच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले. याच दबावामुळे तिने शेवटी आत्महत्या केल्याचा संशय विरोधकांनी यावेळी व्यक्त केला होता. दरम्यान, या प्रकरणात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारेंनी भाजपचे माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांचे नाव घेतले आहे. फलटणमधील अनेक घटना निंबाळकर आणि त्यांच्या लोकांच्या हस्तक्षेपामुळे घडत असल्याचा दावा सुषमा अंधारे यांनी केला होता. असे असताना संबधित प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच पोलीस महासंचालकांना एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. अखेर एसआयटी स्थापन करण्यात आली असून खझड तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वात तपास करण्यात येणार आहे. तेजस्वी सातपुते या २०१२ मधील आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी सातारा तसेच सोलापूर जिल्ह्यांमध्ये पोलीस अधीक्षक म्हणून काम केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## एम - सॅण्ड....

होत आहे . महाराष्ट्र शासनाने या क्षेत्रात पारदर्शकता आणि जबाबदार उत्खनन यासाठी हे धोरण लागू केले आहे .एम - सॅण्डचे अनेक फायदे आहेत . नद्यांमधून होणारे अनियंत्रित उत्खनन थांबते आणि पर्यावरणाचे संतुलन राखले जाते . बांधकामासाठी हा दर्जेदार पर्याय आहे , कारण एम - सॅण्डची गुणवत्ता स्थिर असते आणि त्यात माती , सेंद्रिय घटक नसतात . त्यामुळे कॉंक्रीट अधिक मजबूत बनतो . स्थानिक स्तरावर उत्पादन होऊ शकते म्हणून वाहतूक खर्च कमी होतो आणि दर नियंत्रणात राहतात . ग्रामीण भागात थेट व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होते आणि शासनाला नियमित महसूल मिळतो . जिल्हा गौण खनिज अधिकारी व तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले की , एम - सॅण्ड प्रकल्पांमुळे बांधकाम उद्योगाला वाळूचा पर्याय उपलब्ध होत आहे . अवैध उत्खननावर नियंत्रण आणणे आणि वैध व्यवसायाला प्रोत्साहन देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिलेल्या माहितीनुसार , जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून प्रस्ताव सादर झाले असून , त्यापैकी बहुतांश मंजूर झाले आहेत . शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार परवानग्या , पर्यावरणीय मान्यता आणि सुरक्षा उपाययोजना पूर्ण करून हे प्रकल्प लवकरच सुरू होणार आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की , प्रत्येक प्रकल्पाच्या कामकाजात पारदर्शकता , पर्यावरणीय तपासणी आणि स्थानिक ग्रामसभेची संमती यावर भर द्यावा . छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी एम - सॅण्ड धोरण हे विकास व पर्यावरण यांचा समतोल राखणारे धोरण आहे असे आवाहन केले आहे . विभागातील सर्व जिल्ह्यांनी या संधीचा उपयोग करून स्थानिक संसाधनांवर आधारित अर्थव्यवस्था उभी करावी , असे म्हटले आहे .महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना निर्देश दिले आहेत की , एम - सॅण्ड प्रकल्पांना प्राधान्य देऊन पारदर्शक खनिज व्यवस्थापन सुनिश्चित करावे . अवैध वाळू उत्खननावर नियंत्रण आणण्यासाठी ही धोरणात्मक दिशा महत्त्वाची ठरेल . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सांगितले की , एम - सॅण्ड प्रकल्पांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील . गावपातळीवरील तरुणांना तांत्रिक प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योगाशी जोडले जाणार आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी म्हटलं की , शासनाच्या एम - सॅण्ड धोरणामुळे बांधकाम क्षेत्राला किफायतशीर आणि उपलब्ध वाळू मिळेल . तसेच पर्यावरणीय संरक्षण आणि महसूल वाढ या दोन्ही बाबी साध्य होतील .

## काँग्रेस पक्ष...

लढवू इच्छिणाऱ्या नगराध्यक्षपद आणि नगरसेवक पदासाठी इच्छुकांनी आपले उमेदवारी मागणी अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह मंगळवार, दिनांक २ नोव्हेंबर ते दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजेपर्यंत या वेळेत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष गेवराई संपर्क कार्यालय नवीन बस स्थानकासमोर व युवक काँग्रेस कार्यालय यांच्या कोल्हेर वेस च्या आत येथे दाखल करावेत. या ठिकाणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे तालुकाध्यक्ष महेश बेदरे (मोबाईल - ९८८१०४५३१५) हे दिलेल्या वेळेत उपस्थित राहून सदरचे अर्ज स्विकारतील. गेवराई येथे आयोजित केलेल्या बैठकीस काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबुराव पोटभरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली या बैठकीस तालुका उपाध्यक्ष मनोहर चाळक, मधुकर वारे, शहराध्यक्ष सय्यद सिराज, तालुका सरचिटणीस प्रकाश राऊत,ज्येष्ठ काँग्रेस नेते अंकुशराव पाचपुते, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरण अजबकर, गिराम पाटील आदि पदाधिकारी उपस्थित होते तरी सर्व इच्छुक उमेदवार असतील त्यांनी उमेदवारी मागणी अर्ज भरून घ्यावेत असे आवाहन गेवराई काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे व बीड जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी केले आहे.

## सीना नदीवरील...

परिश्रम घेतले, हा खऱ्या अर्थाने सेवा आणि बांधिलकीचा आदर्श ठरला आहे.या कामात आ. सुरेश धस यांचे नेतृत्व, महसूल विभागातील आष्टीचे तहसीलदार वैशाली पाटील व कर्जत तहसीलदार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या बंधाऱ्याच्या पुनर्निर्माणामुळे परिसरातील हजारो शेतकऱ्यांना आता येणाऱ्या उन्हाळ्यात पाण्याची भीती नाही. त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा समाधान आणि आशेचे हास्य फुलले असल्याने नाम फाउंडेशन व आ.सुरेश धस यांचे आभार मानले जात आहेत.

## केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या...

आढावा बैठकीस ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांच्यासह सर्व प्रमुख संयोजकांची उपस्थिती होती. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांची प्रेरणा आणि संकल्पनेतून दिनांक ०७ नोव्हेंबर रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा संपन्न होत आहे. या कार्यक्रमास देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन तथा दुधविकास मंत्री पंकजाताई मुंडे, खा.बजरंग सोनवणे, खा.रजनीताई पाटील, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित असतील. सदरील कार्यक्रमास राज्यातील ३५ ते ४० हजार शेतकरी उपस्थित राहणार आहेत. मागील अनेक दिवसांपासून कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू आहे. आलेल्या शेतकऱ्यांना बसण्यासाठी वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात येत आहे तर येणाऱ्या मान्यवरांचे हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी कार्यक्रम स्थळीच हेलिपॅडची व्यवस्था करण्यात येत आहे. कृषीकुल प्रशिक्षण केंद्र सिरसाळा येथे जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या प्रशासकीय आढावा बैठकीस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, नगर पालिका, तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती आरोग्य विभाग आदींसह अनेक शासकीय विभागांचे कार्यालयीन प्रमुखांची उपस्थिती होती. अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा※- मराठवाडा हा सर्वाधिक दुष्काळी प्रदेश म्हणून गणल्या जातो. कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळा सतत पडल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कमालीची ढासळली आहे. आर्थिक संकटात आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्येचे मार्ग पत्करले. ही परिस्थिती कुठेतरी बदलली पाहिजे, त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे, त्यांच्यातील हरवलेला आत्मविश्वास पुन्हा नव्याने जागवला पाहिजे हा या शेतकरी संवाद मेळाव्याचा प्रमुख उद्देश असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना ग्लोबल विकास ट्रस्टकडून तयार करण्यात आल्या असून त्यांचीही घोषणा याच कार्यक्रमात होणार आहे. त्यामुळे हा अभूतपूर्व व भुतो न भविष्यती असा शेतकरी संवाद मेळावा होणार आहे. या मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## नेकनूर येथे...

थांबवावी अन्यथा चिखल फेक करणाऱ्यांना याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. तसेच छाया पांचाळ यांच्या मृत्यू प्रकरणी बीड जिल्हा रुग्णालयातील संबंधित डॉक्टर व नर्स यांच्यावर कठोर कारवाई करून दोन्ही भगिनींना न्याय मिळवून द्यावा. जोपर्यंत दोन्ही भगिनींना न्याय मिळत नाही तोपर्यंत बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात आंदोलन उभा करून मी हा लढा सर्वांना सोबत घेऊन लढणार आहे. तसेच यावेळी ऍड. जगदीश शिंदे, सतीश पायाळ ( जिल्हाध्यक्ष भीमशक्ती बीड ), सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदा पांचाळ, आम्रपाली साबळे, सादेक सय्यद (शहराध्यक्ष आप बीड), अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आप बीड) यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सर्वांनी यावेळी दोन्ही भगिनींना न्याय मिळावा. आरोपींना कठोर शासन व्हावे तसेच फलटण येथे पत्रकार परिषद घेऊन आरोपीची बाजू घेणाऱ्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची हकालपट्टी करावी. आणि आरोपींना क्लीन चीट देणाऱ्या मुख्यमंत्र्याचा निषेध केला. या ठिकाणी दोन्ही भगिनींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आप बीड), किस्किंदा पांचाळ( सामाजिक कार्यकर्त्या बीड), ऍड. जगदीश शिंदे, आम्रपाली साबळे (सामाजिक कार्यकर्त्या बीड), सादेक सय्यद (शहराध्यक्ष आप बीड), सतीश पायाळ ( जिल्हाध्यक्ष भीमशक्ती बीड ), रायचंद कापसे (शिवसंग्राम नेते नेकनुर सर्कल), गेवराई येथील सामाजिक कार्यकर्त्या शाहीन पठाण, चंद्रकला बावचकर, गोरक्षनाथ कदम (शिवसेना (उबाठा) उपतालुकाप्रमुख बीड), विलास किलमिसे (सरपंच अंबिलवडगाव), शिलावती पांचाळ, जगन्नाथ घोडके, बाबुराव कदम, गणेश पांचाळ, कैलास खराडे, शशिकांत आंधळे, विनोद जगताप, भारत साळवे, कल्याण घोरपडे, सोमनाथ पांचाळ, रोशन पायाळ, रमेश खराडे, दिनकर तांदळे, आश्रुबा मुंडे, आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सत्तेचा उपयोग...

सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले यांनी केले. यावेळी पृथ्वीराज पवळ, दत्तात्रय तांबारे, सखाराम तांबारे, मुजीब शेख, नाथ राजळकर, बाळासाहेब राजळकर, ज्ञानेश्वर वाघमोडे, सुरज राजळकर, अभिमान राजळकर, रामा सागडे, राजेंद्र पवळ, बाळासाहेब कोळेकर, सत्यवान रडे, मच्छिंद्र कोळेकर, अर्जुन वखरे, संजय रडे, दत्ता रडे, संतोष थोरात, भिमराव राजळकर, सचिन भागवत रडे, अशोक पवार , सुंदर मार्कड, यादव कारंडे, संतोष थोरात, अशोक कारंडे, रामकिसन कारंडे, अर्जुन पवळ, परमेश्वर जाधव, बंडु जाधव, प्रदिप कांगडे, केशव जाधव, आविनाश आरेकर, पांडुरंग टाकसाळ, कृष्णा शेजाळ, किशोर रडे, शहादेव खोड, शहादेव घुगे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. यावेळी जयभवानीचे माजी व्हा. चेअरमन आप्पासाहेब औटी, विठ्ठलराव शेळके, पांडुरंग गाडे, कुमारराव ढाकणे, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, माजी सभापती मुजीब पठाण, पांडुरंग कोळेकर, जगन्नाथ शिंदे, सुभाषराव पवळ, किशोर कांडेकर, कालिदास नवले, जालिंदर पिसाळ, मदनराव घाडगे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, राजाभाऊ वारंग, बळीराम रसाळ, विकास सानप, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, शेख खाजाभाई, दादासाहेब घोडके, उपसभापती श्रीहरी पवार आदींसह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

## अबब! धुमेगाव....

असता नारायण मगर यांच्या गट क्र. १९० मध्ये ४४ झाडे वजन १५३.१५ किलो किंमत ४२ लाख ८८ हजार २०० रुपये आणि सुरेश मगर यांच्या शेतात १३१ झाडे वजन ३३७.५५ किलो किंमत ९४ लाख ५१ हजार ४०० रुपये असा एकूण ४९०.७० किलो मुद्देमाल जप्त करण्यात आला. नारायण शेषेराव मगर यास ताब्यात घेण्यात आले आहे. सुरेश सर्जेराव मगर फरार असून त्याचा शोध सुरू आहे. याप्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास चकलांबा पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शिवाजी बंटेवाड यांच्या पथकाने केली. महसूल विभागानेही सहकार्य केले. बीड पोलिसांनी छब्झड विशेष सेल स्थापन केला असून अंमली पदार्थांची माहिती देण्यासाठी ९२७०२४३२०० हा क्रमांक जारी केला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांसाठी 'सी-ट्रिपल आयटी' मंजूर

**• उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराला टाटा टेक्नॉलॉजीचा सकारात्मक प्रतिसाद**



**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने आता नाशिक आणि अमरावती या दोन जिल्ह्यांना प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग' म्हणजेच 'सी-ट्रिपल आयटी' केंद्र मंजूर करण्यात आले आहे. उद्योग आणि कौशल्य विकास क्षेत्रात महाराष्ट्राला आघाडीवर ठेवण्याच्या प्रयत्नांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी काही दिवसांपूर्वी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांमध्ये सी-ट्रिपल आयटी उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. कंपनीकडून पत्रास सकारात्मक प्रतिसाद देत, दोन्ही जिल्ह्यांसाठी 'सी-ट्रिपल आयटी' केंद्रे स्थापन करण्यास टाटा टेक्नॉलॉजीने अधिकृत मान्यता दिली आहे.

या 'सीट्रिपलआय' सेंटरमुळे स्थानिक युवकांसाठी जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. या निर्णयामुळे उत्तर महाराष्ट्र (नाशिक) आणि विदर्भ (अमरावती) या दोनही भागातील युवकांना जागतिक दर्जाचे औद्योगिक प्रशिक्षण मिळण्याची दारे उघडली जाणार आहेत. सोबतच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ख) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य, आवश्यक प्रशिक्षण यासारख्या संधी आपल्या जिल्ह्यातच उपलब्ध होतील. या केंद्रांमुळे स्थानिक पातळीवर उद्योगांना कुशल मनुष्यबळ सहज उपलब्ध होईल, नवउद्योगांना चालना मिळेल आणि स्वयंरोजगार व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. 'सी-ट्रिपल आयटी' केंद्रांमुळे औद्योगिक क्षेत्राला प्रशिक्षित, कुशल आणि तांत्रिकदृष्ट्या समर्थ युवक मिळतील, नवउद्योगांच्या स्थापनेस प्रोत्साहन मिळेल, स्थानिक अर्थव्यवस्था आणि उद्योगविकासाला बळकटी मिळेल, तसेच युवकांना जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल.

राज्यातील युवकांना रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करून 'मेक इन महाराष्ट्र' या संकल्पनेला बळकटी देण्याचा उपक्रम म्हणून या दोन केंद्रांना मोठे महत्त्व आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी राज्यातील औद्योगिक जिल्ह्यांना कौशल्य विकासाचे नवे केंद्र बनविण्याचा संकल्प केला असून, या निर्णयामुळे त्या दिशेने एक ठोस पाऊल उचलले गेले आहे. या 'सी-ट्रिपल आयटी' केंद्रांमधून विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाविषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल. 'रोबोटिक्स', 'इंटरनेट ऑफ थिंग्स (खेढ)', 'डेटा नालिटिक्स, 'इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञान', 'ऑटोमेशन' अशा अत्याधुनिक क्षेत्रांत युवकांना प्रशिक्षण मिळेल. उपमुख्यमंत्री पवार यांच्या पुढाकारातून नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांना मिळालेली 'सी-ट्रिपल आयटी' केंद्रे ही राज्याच्या औद्योगिक आणि कौशल्य विकास क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरतील.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील भरती प्रक्रिया पारदर्शक व ऑनलाईन होणार ; सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि पात्र उमेदवारांना संधी मिळावी.यासाठी भरती प्रक्रिया आता ऑनलाइन पद्धतीने करण्याचा राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या परीक्षेसाठी खइझड (इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शन), TCS (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) आणि MKCL (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) या नामांकित संस्थांमार्फत प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामध्ये स्थानिक उमेदवारांना



प्राधान्य देण्यात येणार आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कामकाज त्या जिल्हापुरते मर्यादित असल्याने, त्या जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. बँकेच्या सेवेत येण्यासाठी उमेदवाराकडे संबंधित जिल्ह्यातील मूळ रहिवासी प्रमाणपत्र अथवा अधिवास प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. यामध्ये ७० टक्के जागा संबंधित जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात येणार असून उर्वरीत ३० टक्के जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांसाठी खुल्या असतील. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या स्तरावर तयार करण्यात आलेल्या या मार्गदर्शक सूचनांना शासनाने मंजुरी दिली आहे. यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया अधिक विश्वसनीय, पारदर्शक आणि जनतेचा विश्वास वाढविणारी ठरेल. असा विश्वास मंत्री पाटील यांनी व्यक्त केला आहे. संबंधित शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्य www. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# श्री. सोमेश्वर महादेव मंदिर येथे आज सामुहिक महाआरती

**बीड । प्रतिनिधी**

श्री. सोमेश्वर महादेव मंदिर बार्शी रोड बीड येथे आज सोमवार निमित्ताने सामूहिक महाआरती होणार आहे. तरी या महाआरतीचा लाभ घेण्यासाठी बीड पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आव्हान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. या बाबद ट्रस्ट चे अध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे यांनी कळवले आहे. की, सोमवार रोजी



सायंकाळी ७:११ मी. श्री. क्षेत्र सोमेश्वर महादेव मंदिर, बार्शी रोड, बीड येथे महादेवाच्या सामुहिक महाआरतीचे आयोजन केले आहे. तरी सर्व सोमेश्वर भाविक भक्तांनी महाआरती उपस्थित राहावे. दिनांक ०३ नोव्हेंबर रोजी वार – सोमवार,वेळ – सायंकाळी ०७.११ मि. आयोजक – श्री सोमेश्वर महादेव मंदिर, विश्वस्त मंडळ, बीड. विनित सौ. रुक्मिणीताई नवनाथ शिराळे, ॲड. गोविंद नवनाथ शिराळे.

# बारामती पॉवर मॅरेथॉन एकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम : मंत्री मकरंद पाटील

**५ हजारांहून अधिक धावपटूंचा उत्स्फूर्त सहभाग**

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती पॉवर मॅरेथॉन हा केवळ एक क्रीडा उपक्रम नाही, तर आरोग्यदायी जीवनशैलीचा उत्सव आणि सामूहिक एकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे, असे प्रतिपादन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी केले. मंत्री पाटील यांच्या हस्ते बारामती स्पोर्ट फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित बारामती पॉवर मॅरेथॉनला झेंडी



दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील,उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष कार्यकारी खासगी सचिव विकास ढाकणे, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी सुनील मुसळे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, एमआयडीसी बारामतीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय अधिकारी वैभव

# शिर्डी औद्योगिक वसाहतीत स्थानिक युवकांना रोजगारास प्राधान्य : उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील ६०० एकर परिसरात भविष्यात विविध उद्योग उभारले जाणार असून, या उद्योगांच्या स्थापनेदरम्यान कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होऊ नयेत, यासाठी उद्योजकांनी रोजगार देताना किमान ८० टक्के स्थानिक युवकांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले. शिर्डी औद्योगिक वसाहतीतील श्री



सदगुरू नारायणगिरी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि टाटा टेक्नॉलॉजी संचलित कौशल्यवर्धन केंद्राच्या भूमिपूजन व कोनशिला अनावरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अमोल खताळ, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजयराव मुळीक, एमआयडीसीचे प्रादेशिक व्यवस्थापक गणेश राठोड, उपविभागीय अधिकारी माणिक आहिरे, टाटा टेक्नॉलॉजीचे सुशीलकुमार, टाटा कन्सल्टन्सीचे समन्वयक प्रितम गांजेवार, राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, तसेच कैलास कोते, अभय शेळके आदी उपस्थित होते. उद्योगमंत्री डॉ. सामंत म्हणाले की, राज्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यासाठी दिवंगत रतन टाटा यांच्याकडे ५० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यावर त्यांनी तब्बल ८०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले. या निधीतून शिर्डी औद्योगिक वसाहतीत कौशल्यवर्धन केंद्र उभारले जात आहे. हे केंद्र स्थानिक युवकांच्या कौशल्य वृद्धीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, या परिसराचा औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

# संतांचे विचार आणि वारकरी परंपरा समाजाला ऊर्जा देणारी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज समाधी मंदिराचे उद्घाटन व भक्तनिवासाचे लोकार्पण**

**पंढरपूर । प्रतिनिधी**

वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीत येणारा वारकरी हा आमचा प्रथम व्हीआयपी आहे. संतांचे विचार आणि वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री तथा आमदार तानाजी सावंत, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी



कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, संस्था प्रमुख दादा महाराज मोरे माऊली, स्वामी अमृता आश्रम महाराज, चकोर महास्वामी बाविस्कर, हभप अक्षय भोसले महाराज, सरपंच जयलक्ष्मी माने व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

शासनाने मंदिरांच्या जतन व संवर्धनासाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, आषाढी दिंडी अनुदान, विमा योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने गाईला गोमातेचा दर्जा दिला आहे. हे राज्य संत, वीर, शेतकरी आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे, असे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी श्री संत मोरे परिवाराच्या वारकरी परंपरेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, हे सरकार शेतकरी आणि वारकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. संकटात असलेल्या जनतेच्या मदतीला तत्परतेने धावून जाण्याची आमची भूमिका आहे.

प्रारंभी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते श्री संत मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन तर भक्तनिवास क्र. १ चे लोकार्पण रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते झाले.

# राष्ट्र उभारणीचा मुख्य पाया शिक्षक

## शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्राधान्य देऊ: सुषमा अंधारे मॅडम

**बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी घेतली शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांची भेट!**

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्र उभारणीचा मुख्य पाया शिक्षक आहेत. ही बाब सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर केल्या पाहिजे. परंतु दुर्दैवाची गोष्ट या राज्यामध्ये शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम राज्य सरकारकडून केले जाते. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सदैव प्राधान्य देत आहोत. यापुढे शिक्षकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवू असे आश्वासन शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिवसेना शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री लक्ष्मण बहिरवाळ आणि विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांच्याशी बोलताना दिले. या वेळी त्यांच्या समवेत शिवसेना जिल्हाप्रमुख



उल्हास गिराम आणि नितीन भैय्या धांडे आदी उपस्थित होते.

शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या अतिशय निकटवर्तीय आणि शिवसेनेच्या उपनेत्या मा. सुषमाताई अंधारे मॅडम ह्या आज गुरुवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरात आल्या होत्या. यावेळी बीड शहरातील शिक्षकांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नावर चर्चा केली. यावेळी बोलताना सुषमाताई अंधारे मॅडम म्हणाल्या की, शिक्षक हे समाजाचे योग्य दिशा दर्शक आहेत. ते मुलांचा सर्वांगीण विकास घडवून सुसंस्कारित पिढी निर्माण करतात. हीच पिढी देशाच्या विकासात महत्त्वाचा वाटा उचलते ; म्हणूनच राष्ट्र उभारणीचा मुख्य पायाच शिक्षकाना मानले जात आहे. ही बाब शासनाने आणि समाजाने लक्षात घेतली पाहिजे. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर केल्या पाहिजे. परंतु दुर्दैवाची गोष्ट या राज्यामध्ये शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम सरकारकडून केले जाते. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्राधान्य देतो यापुढे ही प्राधान्य देऊ असे शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष श्री. लक्ष्मण बहिरवाळ आणि विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांच्याशी चर्चा करताना सांगितले. या वेळी श्री लक्ष्मण वाघमारे सर, श्री शिंदे सर, श्री. शिवप्रसाद सिरसाट सर यांच्यासह इतर शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# मुख्यमंत्री फडणवीसांचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय कौतुकास्पद : नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

सध्या केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे मा श्री नरेंद्रजी भाई मोदी साहेब यांचे सरकार असून देशातील गोरगरीब सर्वसामान्य वंचित लोकांपर्यंत मोठ्या मोठ्या शासकीय योजना कशा पोहोचल्या जातील व त्यांना कसा लाभ मिळवून देण्यामध्ये यशस्वी ठरलेले मा पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी साहेब एक यशस्वी पंतप्रधान म्हणून सध्या जगभरामध्ये ओळखल्या जाऊ लागले आहेत. ते सातत्याने गोरगरीब लोकांना सर्व योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील व यशस्वी मा पंतप्रधान यांनी केलेले प्रयत्न सातत्याने यशस्वी होत.असून केंद्र सरकारच्या बाबतीत सर्वत्र जगभरा मधून कौतुक व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीचे सरकार असून या महायुतीचे कर्तव्यदक्ष आणि कर्तबदार सर्वांच्या मनामध्ये बसलेले देव देश आणि धर्म यासाठी सातत्याने आपले कर्तव्य पार पाडणारे असे उत्कृष्ट आणि सुसंस्कृत स्वतः वकील असलेले अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत येणाऱ्या २०२६ मध्ये पूर्णपणे कर्जमाफी करु असे अभ्यासपूर्वक वचन सर्व महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना त्यांनी दिल्यामुळे शेतकऱ्यांना एक फार मोठा धीर त्यांनी दिला आहे. म्हणून या शेतकऱ्याच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाच्या बाबतीत मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस साहेब यांच्या उत्कृष्ट कार्याचे बीड जिल्ह्यातील शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी समाधान व्यक्त करून बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी महाराष्ट्रातील तमाम लाडक्या बहिणींसाठी लाडकी बहीण नावाची चांगल्या प्रकारची महाराष्ट्रातील गोरगरीब महिलांना माता भगिनींना एक आधार देणारी योजना सुरू केली आहे. तसेच दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत देखील त्यांनी एक हजार रुपये मानधन वाढवले आहे.आता दिव्यांग व्यक्तीला पहिले दीड हजार रुपये मासिक महिना मिळत होता परंतु देवा भाऊ यांनी एक हजार रुपयांची भर या योजनेमध्ये टाकल्यामुळे प्रत्येकी दिव्यांग व्यक्तीला संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून अडीच हजार रुपये महिना मिळू लागला आहे. याबाबतीत देखील महाराष्ट्रातील तमाम दिव्यांग बांधवांमधून देखील समाधान व्यक्त होत असल्याचे या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. येणाऱ्या भविष्य काळामध्ये आपण बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांमध्ये जाऊन देखील भारतीय जनता पार्टीची शाखा सर्वत्र गावोगाव करणार आहोत.तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्य देखील आपण सर्वसामान्य माणसांना या शाखा ओपनिंगच्या माध्यमातून सांगणार आहोत. आणि शेतकऱ्यांच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या योजनेच्या निर्णयाच्या बाबतीत सर्व शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत असून आता पुढेही येणाऱ्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता महाराष्ट्र मध्ये सर्वत्र येईल व भविष्यात लोकहिताचे चांगल्या प्रकारे निर्णय घेणारे अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले कायमस्वरूपी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देखील देवेंद्र जी फडणवीस साहेब हेच असावेत अशी चर्चा देखील आता सर्व शेतकरी बांधवांमधून होत आहे.असे प्रसिद्धस दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे तसेच रब्बी पिकाचा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी आपापला विमा काढून स्वतःचा फायदा कसा होईल किंवा शासनाच्या धोरणामध्ये सहभागी होऊन रब्बीचा पीक विमा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी मुदतीच्या आत आपापले पैसे भरावेत विमा काढून घ्यावा घ्यावा असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजप नेते मा नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे आणि भविष्यात देवा भाऊ नक्कीच शेतकऱ्यांना रब्बी पीक विमाच्या बाबती देखील विमा कंपनीच्या माध्यमातून भरपूर शेतकऱ्यांच्या हिताची व शेतकऱ्याला आर्थिक मदत करून देतील असा विश्वास ही या वेळी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी व्यक्त केला व मा श्री देवा भाऊ फडणवीस साहेब यांच्या महायुती सरकारच्या बाबतीत समाधान व्यक्त केले .

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### कापसाच्या झाल्या वाती अन् सोयाबीनची झाली माती



देगलूर । प्रतिनिधी

परतीच्या पावसाने दिलेल्या तडाख्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यात परतीच्या पावसाने कापूस, सोयाबीनच्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.देगलूर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकाची लागवड केली जाते, यावर्षी चांगला भाव मिळणार, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कापसाचीही मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. मात्र, दोन्ही पिकांचे परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. कापसाच्या वाती आणि सोयाबीनची माती अशीच काय ते शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची अवस्था आहे. सुरुवातीला महागडी खत, बियाणं खरेदी करून शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केली होती. ऑगस्ट, सप्टेंबर आणि आक्टोबर महिन्यांत ओरदार झालेल्या पावसाने सुरुवातीपासूनच ही पिके पावसाच्या कचाट्यात आली, तरीही शेतकरी उभे राहिले. मात्र, आता सुरु असलेल्या परतीच्या पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतात उभी असलेली सोयाबीन आणि कापलेल्या सोयाबीनच्या सुड्या भिजून गेल्या, तर अनेक ठिकाणी शेतात पाणी साचले आहे. त्यामुळे पाण्यातून सोयाबीन काढण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. वेचणीला आलेल्या कापसाचीही काही वेगळी अवस्था नसल्याचे चित्र आहे. कापूस पाण्यामुळे भिजल्याने मोठ नुकसान होत आहे. शेतातून निघणाऱ्या या उत्पादनावर आर्थिक गणित अवलंबून असते. मात्र, आता ऐन तोंडावर शेतातून उत्पादन निघणार नसल्याने काय करायचं असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. एकीकडे शेतकऱ्याचे एवढा मोठा नुकसान झाले असताना कोणाला त्याची जाणीव सुद्धा झाली नाही आता मात्र निवडणूक तोंडावर येताच आम्ही शेतकरी नेते असल्याचा आव आणतानाचा चित्र पाहायला मिळत आहे.

**● शेतात सडलं सोयाबीन, डोळ्यांत आलं पाणी,रस्त्या अभावी मेहनत गेली, शेतकऱ्यांची कोण ऐकणार ही कहाणी ?अशी गत शेतकऱ्याची झाली आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांसाठी नैसर्गिक कारणे कशी जबाबदार ? शेतकऱ्यांच्या आत्महत्या सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे सुद्धा वाढत आहेत.एकीकडे परतीच्या पावसानी घात केला तरी दुसरीकडे सरकार पिकाला भाव देत नाही.अशा वेळी शेतकऱ्यांच्या व्यथा सांगाव्या तरी कोणाला, असा प्रश्न पडतो. –ॲड. सुरेखा गोविंद राठोड (कारभारी)**

# एम सॅन्ड धोरणामुळे जिल्ह्यात बांधकाम क्षेत्राला नवा श्वासं

## महाखनिज पोर्टलवर अर्ज करा – प्रशासनाचे आवाहन

**●८१ प्रस्ताव पाठविले त्यापैकी ७३ प्रस्तावांना प्राथमिक मान्यता**

बीड । प्रतिनिधी



राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने अंमलात आणलेल्या एम – सॅण्ड ( कृत्रिम वाळू ) धोरणामुळे बीड जिल्ह्यातील बांधकाम , विकासकामे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा प्रशासनाने या धोरणाची अंमलबजावणी जलद गतीने सुरू केली असून , जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून एकूण ८१ प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले आहेत . या पैकी ७३ प्रस्तावांना शासनाची मान्यता मिळाली असून , उर्वरित काही प्रस्तावांचा तांत्रिक अभ्यास सुरू आहे . हे सर्व प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या गौण खनिज उत्खनन व विकास नियम २०१३ अंतर्गत कार्यवाहीस पात्र ठरले आहेत . एम – सॅण्ड म्हणजे कृत्रिम वाळू – नैसर्गिक वाळूच्या पर्याय म्हणून तयार केलेली खनिज सामग्री . दगडांच्या प्रक्रियेमधून , विशिष्ट यंत्रणेद्वारे तयार केलेली ही वाळू बांधकामासाठी अत्यंत उपयुक्त , दर्जेदार आणि पर्यावरणपूरक मानली जाते . पूर्वी नैसर्गिक वाळूवर अवलंबून असलेले बांधकाम क्षेत्र आता एम – सॅण्डमुळे स्वावलंबी

▶▶ उर्वरित पान २ वर

# अबब! धुमेगाव शिवारातून तब्बल 1 कोटी 37 लाखांचा गांजा जप्त; एक अटकेत, एक फरार

गेवराई । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतजमिनींच्या आडोशाखाली अंमली पदार्थांचा काळा धंदा फोफावत असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. गेवराई तालुक्यातील मौजे धुमेगाव शिवारातील पिराचे शेत नावाच्या शेतात कापसाच्या पिकामध्ये लपवून ठेवलेली तब्बल ४९०.७० किलो गांजाची झाडे बीड एलसीबीच्या पोलिसांनी शोधून काढली. या गांजाच्या झाडांची किंमत १,३७,३९,६०० रुपये आहे. आरोपी नारायण शेषेराव मगर याला अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी फरार आहे. धुमेगावमध्ये गांजाची लागवड सुरू असल्याची



गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेकडे १ नोव्हेंबर रोजी आली होती. त्यानुसार बीड गुन्हे शाखा व चकलांबा पोलीस पथकाने शेतावर छापा टाकला. कापसाच्या शेतात अंतर ठेवून गांजाची रोपे वाढवून त्यांची काळजीपूर्वक जपणूक केली जात असल्याचे दिसून आले. चौकशीत नारायण शेषेराव मगर, वय ४४, रा. धुमेगाव याने लागवडीची कबुली दिली. पोलिसांनी आजूबाजूला शोध घेतला असता शेजारील शेतही 'हिरवे' निघाले. सुरेश सर्जेराव मगर यांच्या जमिनीतही मोठ्या प्रमणावर गांजाची झाडे आढळली. पंचनामा करण्यात आला

▶ उर्वरित पान २ वर

# काँग्रेस पक्ष गेवराई नगरपरिषद स्वयंबळावर लढणार

## काँग्रेस पक्षाकडून नगरपालिका निवडणूक इच्छुकांनी उमेदवारी मागणी अर्ज दाखल करावेत : तालुकाध्यक्ष महेश बेदरे, अँड श्रीनिवास बेद्रे यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष गेवराई नगरपरिषदेची निवडणुक देशाचे नेते राहुलजी गांधी, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तर प्रदेश सरचिटणीस आदित्य दादा पाटील जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे व पक्षनिरीक्षक अन्वर बापू देशमुख यांच्या नेतृत्वात स्वबळावर लढवणार आहे. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका



संदर्भात गेवराई येथील शासकीय विश्रामगृह येथे गेवराई तालुका काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली या बैठकीत ठराव घेऊन निर्णय घेण्यात आला की काँग्रेस पक्ष आगामी सर्व निवडणुका स्वयंबळवार लढणार असून गेवराई नगर परिषदेची निवडणूक गेवराई शहराचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी मोठ्या ताकदीने लढविणार आहे. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून नगरपालिका निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी उमेदवारी मागणी अर्ज दाखल करावेत असे आवाहन गेवराई तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेश बेदरे व युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी केले आहे. गेवराई शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेस पार्टी गेवराई शहरच्या प्रमुख पदाधिकारी आणि नगरपालिकेची निवडणूक

▶ उर्वरित पान २ वर

# सीना नदीवरील खडकत-१ बंधाऱ्याचे पुनर्निर्माण पूर्ण

## नाम फाउंडेशन व आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराने जलसाठ्याला नवा श्वास!

आष्टी । प्रतिनिधी

अतिवृष्टीच्या तडाख्यात सीना नदीने कहर केला आणि नदीपात्रातील पाच बंधारे वाहून गेले. त्यात खडकत-१ व सांगवी संगमेश्वर (ता. आष्टी, जि. बीड) येथील बंधाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या बंधाऱ्यांवर अवलंबून असलेली सुमारे ८ ते १० हजार हेक्टर बागायती शेती पाण्याअभावी धोक्यात आली होती. महापुरानंतरची स्थिति पाहण्यासाठी राज्याचे महसूल मंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली. यावेळी आ. सुरेश धस




यांनी सांगितले की जर हे बंधारे तातडीने दुरुस्त केले नाहीत तर आष्टी तालुका पुन्हा दुष्काळग्रस्त होईल. या गंभीर परिस्थितीची जाणीव होताच आमदार धस यांनी नाम फाउंडेशनशी संपर्क साधून मदतीचे आवाहन केले. तत्परतेने प्रतिसाद देत फाउंडेशनने २० ऑक्टोबर रोजी कामास प्रारंभ केला.केवळ १० ते १५ दिवसांच्या कालावधीत, नाम फाउंडेशन, महाराष्ट्र शासन आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हे काम पूर्णत्वास आले आहे. दिवाळीचा सण असतानाही आणि रात्री उशिरापर्यंत सर्व मशीन ऑपरेटर व कामगारांनी न थकता

▶ उर्वरित पान २ वर

# केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत ०७ नोव्हेंबर रोजी भव्य शेतकरी संवाद मेळावा!

## कृषीकुल येथे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली प्रशासकीय आढावा बैठक

परळी वै. । प्रतिनिधी

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीचा रविवार, दिनांक ०२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आढावा घेतला. कृषीकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस विविध शासकीय कार्यालयांचे कार्यालयीन प्रमुख उपस्थित होते. शेतकरी संवाद मेळाव्यास मराठवाड्यातील



हजारो शेतकरी उपस्थित राहणार आहेत. याच ठिकाणी कृषी प्रदर्शिनी भरवण्यात येणार आहे. युद्ध पातळीवर मंडप उभारणी, हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी हेलिपॅड तयार करण्यात येत असून, सुरू असलेल्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. सर्व प्रशासकीय विभागांना त्यांनी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. या

▶ उर्वरित पान २ वर

# नेकनूर येथे डॉ. संपदा मुंडे व छाया पांचाळ यांच्या मृत्यूप्रकरणी निषेध बैठक संपन्न

## दोन्ही भगिनींना न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवणार : बाळासाहेब मोरे पाटील

बीड । प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या स्वर्गीय डॉ. संपदा मुंडे मृत्यू प्रकरण आणि बीड जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या चुकीमुळे बीड तालुक्यातील आंबील वडगाव येथील स्वर्गीय छाया पांचाळ मृत्यू प्रकरणी शिवशक्ती भीमशक्ती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी नेकनूर येथे ०२ ऑक्टोबर



रविवार रोजी दुपारी एक वाजता निषेध बैठक आयोजित केली होती. यावेळी दोन्ही भगिनींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या निषेध बैठकीत शिवशक्ती भीमशक्ती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील असे म्हणाले की, स्वर्गीय डॉ. संपदा मुंडे प्रकरणी एसआयटी दाखल करून सखोल तपास करावा आणि आरोपींना कठोर शासन करावे. तसेच सदरील प्रकरणावरून लक्ष विचलित करण्यासाठी डॉ. संपदा मुंडे यांच्यावर होणारी चिखल फेक

▶ उर्वरित पान २ वर

# सत्तेचा उपयोग दर्जेदार विकास कामांसाठीच होईल: अमरसिंह पंडित

## भाजपाचे माजी पं.स.सदस्य अनिल पवळ यांच्यासह समर्थकांचा राष्ट्रवादीमध्ये जाहिर प्रवेश

गेवराई । प्रतिनिधी

शासकीय योजनेतुन वैयक्तीक लाभ देतांना कधीच पक्ष, जात, धर्म याचा विचार केला नाही, सत्तेचा उपयोग सदैव दर्जेदार विकास कामांसाठीच होईल असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. माजी पं.स.सदस्य अनिल पवळ यांच्या पक्ष प्रवेश प्रसंगी ते बोलत होते. या पक्ष प्रवेश सोहळ्यामुळे अमरसिंह पंडित यांनी आमचे कुटूंब एकत्रित आणले अशी भावना अनिल पवळ यांचे बंधु सुभाष पवळ



यांनी व्यक्त केली. तुम्ही सत्तेसाठी पक्ष सोडला आम्ही स्वाभिमानासाठी राष्ट्रवादीत आलो अशी खोचक टिका सरपंच कालिदास नवले यांनी केली. गेवराई येथील कार्यक्रमात शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देवुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला.

भारतीय जनता पार्टीचे कोळगांव गणातील माजी पं.स.सदस्य अनिल पवळ, सिरसमार्गचे सरपंच सुरेश मार्कड, ग्रा.पं.सदस्य महारुद्र वखरे, गोकुळ जाधव, विश्वांभर रडे, भगवान सागडे यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवुन रविवार दि. २ नोव्हेंबर रोजी गेवराई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. कार्यक्रमाला सिरसमार्ग पंचक्रोशितील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सुभाष पवळ, भारत तांबारे, प्रल्हाद करांडे, मोहनराव पवळ, सोमेश्वर गचांडे आणि कालिदास नवले आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलतांना अमरसिंह पंडित म्हणाले की, या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणुन काम करतांना सुमारे बारा वर्षापुर्वी सिरसमार्ग येथील बॅरेजचे काम आपण पुर्ण केले, त्यानंतर दहा वर्षात बॅरेज जवळील पुल व इतर कामे झाले नाहीत. सिरसमार्ग पंचक्रोशित विकास कामे करण्यासाठी मोठा वाव आहे मात्र मध्यंतरीच्या काळातील निष्क्रीयतेमुळे ही कामे थांबली. टाकळगव्हाण रस्ता, दिमाखवाडी कडे जाणारा पुल, स्मशानभुमी, नविन ट्रान्सफार्मर, दत्त मंदिरा समोरील सभामंडप यासह ग्रामस्थांनी मागणी केलेली सर्व कामे येणार्या काळात पुर्ण होतील. सत्तेचा उपयोग विकासासाठीच होत असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त करुन अनिल पवळ यांच्यासह त्यांच्या सर्व सहकार्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये स्वागत केले.

जयभवानीचे माजी चेअरमन स्व. सुंदरराव पवळ यांच्या परिवाराला पुन्हा एकदा एकत्रित आणण्याचे काम आजच्या प्रवेशामुळे झाले असुन हा परिवार निष्ठेने तुमच्या पाठिशी उभा राहिल असा विश्वास सुभाषराव पवळ यांची आपल्या भाषणात व्यक्त केला. आम्ही पक्ष सोडला म्हणुन आम्हाला गद्दार म्हणणार्यांनी आता स्वत:च्या स्वार्थासाठी आणि सत्तेसाठी पक्ष सोडला, आता यांना काय म्हणायचे ? शिवछत्र परिवाराला कधीही जात-पात शिवली नाही, प्रत्येक कार्यकर्त्याला येथे सन्मानाची वागणुक मिळते, म्हणुनच आम्ही स्वाभिमानासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. समाजाच्या शेवटच्या घटकाच्या विकासासाठी झटणारा शिवछत्र परिवार असल्यामुळे आम्ही या परिवारात सामिल झालो आहोत. येणार्या निवडणुकीत प्रत्येक जागेवर अमरसिंह पंडित उमेदवार म्हणुन उभे आहेत असे समजुन कामाला लागवे असे आवाहन गेवराई तालुका

▶ उर्वरित पान २ वर